# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 09 May 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०९ मे २०२५ दुपारी १.०० वा.**

****

भारत – पाकिस्तान तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर गृहमंत्री अमित शहा यांनी सीमा सुरक्षा दल आणि केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलांच्या महासंचालकांची आज बैठक बोलावली आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनीही आज सरसेना अध्यक्षांसह लष्कर, नौदल आणि हवाई दल प्रमुखांची बैठक घेतली.

****

भारत पाकिस्तान तणावादरम्यान सुरु असलेल्या घटनाक्रमांची दृश्य थेट प्रसारित करु नये, असे निर्देश संरक्षण मंत्रालयाने सर्व प्रसार माध्यमं, डिज़ीटल प्लॅटफॉर्म आणि सामाजिक माध्यमांना दिले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं यासंदर्भात काही मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून, त्यांचं पालन करण्याचे निर्देश संरक्षण मंत्रालयानं आज दिले आहेत. सर्व वाहिन्यांनी संयमाने आणि जबाबदारीने वृत्त प्रसारित करावेत असं सांगून, संवेदनशील किंवा स्रोत–आधारित माहिती दाखवल्यामुळे, कारवाई करतांना धोका निर्माण होऊ शकतो, असं मंत्रालयानं म्हटलं आहे. केबल टेलिव्हिजन नेटवर्क्स २०२१ च्या कायद्यानुसार, दहशतवादविरोधी कारवायांदरम्यान नियुक्त अधिकाऱ्यांनी दिलेली माहितीच प्रसारित करण्यास परवानगी असल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

****

या तणावाच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरु असलेली इंडियन प्रिमियर लीग – आयपीएल क्रिकेट स्पर्धा स्थगित करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ – बीसीसीआयनं या स्पर्धेतल्या संघांच्या प्रमुखांसोबत चर्चा करुन हा निर्णय घेतल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे. आजपासून या स्पर्धेतले सामने होणार नाहीत.

****

जम्मू-काश्मीरमध्ये सांबा जिल्ह्यातल्या आंतरराष्ट्रीय सीमेवर काल मध्यरात्री आंतरराष्ट्रीय सीमेवर दहशतवाद्यांच्या मोठ्या गटाचा घुसखोरीचा प्रयत्न सीमा सुरक्षा दलानं हाणून पाडला. धंधार चौकीवर पाकिस्तानी रेंजर्सकडून झालेल्या गोळीबाराच्या मदतीने करण्यात आलेला हा प्रयत्न पाळत ठेवणाऱ्या ग्रीडने शोधून काढला. सतर्क बीएसएफ जवानांनी किमान सात दहशतवाद्यांना कंठस्नान घातलं आणि पाकिस्तानच्या धंधार चौकीवर मोलं नुकसान केल्याची माहिती, बीएसएफ कडून देण्यात आली.

****

भारत–पाकिस्तानमधल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर उत्तर आणि मध्य भारतातले २४ महत्त्वाचे विमानतळ तात्पुरते बंद ठेवण्यात आले आहेत. पुढील आदेशापर्यंत या विमानतळांवरून कोणतीही उड्डाणे होणार नाहीत. बंद करण्यात आलेल्या महत्त्वाच्या विमानतळांमध्ये श्रीनगर, चंदिगढ, अमृतसर, जोधपूर, जम्मू, लेह, भुज, जैसलमेर, पठाणकोट आणि अन्य १५ विमानतळांचा समावेश आहे.

****

भारत – पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर देशातले एटीएम पुढील दोन – तीन दिवस बंद राहतील, अशी खोटी माहिती समाज माध्यमावरुन प्रसारित होत आहे. हा मेसेज चुकीचा असून, एटीएम नेहमीप्रमाणे चालू राहतील, असं पत्र सूचना कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. नागरीकांनी पडताळणी न केलेले मेसेज शेअर करू नये, असं आवाहन सरकारी यंत्रणांनी केलं आहे.

दरम्यान, देशभरात भरपूर इंधन साठा असून, पुरवठा लाइन्स सुरळीतपणे सुरू असल्याचा खुलासा भारतीय तेल महामंडळानं केला आहे. इंधन आणि एलपीजी सगळीकडे उपल्बध असून, घाबरुन, गर्दी करुन खरेदी करण्याची गरज नाही, सर्वांना अखंड इंधन उपलब्ध होईल याची खात्री देत असल्याचं महामंडळानं म्हटलं आहे.

****

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान सीमेवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था – आयटीआयच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे देण्यात येत आहेत. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज असून याचं प्रशिक्षण प्रत्येक नागरिकाने घेतलं पाहिजे, असं कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी सांगितलं. आयटीआय मध्ये सहा नवे अभ्यासक्रम लागू करणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यात कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहन व्यवस्थापन, इंडस्ट्रिअल रोबोटिक्स

आणि थ्री डी प्रिंटिंग, ड्रोन तंत्रज्ञान, सोलर टेक्निशियन या अभ्यासक्रमांचा समावेश असून येत्या शैक्षणिक वर्षापासूनच याची सुरुवात होणार आहे.

****

देशात मोठ्या प्रमाणात जमा होत असलेल्या इलेक्ट्रॉनिक कचऱ्यापासून दुर्मिळ खनिजं मिळवता येतात अशी माहिती नागपूर इथले भारतीय खाण ब्युरो–आय बी एमचे महा नियंत्रक डॉ पी. एन. शर्मा यांनी दिली आहे. आयबीएम आणि राष्ट्रीय खनिज विकास महामंडळाच्या सहकार्याने आयोजित 'खाणीतील कचर्यापासून दुर्मिळ खनिजे काढणे–संधी आणि आव्हानं' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत ते आज नागपूर इथं बोलत होते. खाणींच्या माध्यमातून उत्खनन झाल्यानंतर उरलेल्या अविशिष्ट कचऱ्यापासून दुर्मिळ खनिजांचं खनन होतं, असं त्यांनी सांगितलं. खाण कचरा, महत्वाच्या खनिज खाणकाम आणि प्रक्रियेतील धोरणात्मक चौकटी, नियामक मुद्दे या विषयावर चर्चा या कार्यशाळेत चर्चा होत आहे.

****

जम्मू–काश्मीरमध्ये श्रीनगर जवळील तंगधार इथं जात असताना सैन्य दलाचे वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात नांदेड जिल्ह्यातले सैनिक सचिन वनंजे यांचं निधन झालं. देगलूर तालुक्यातल्या तमलूर या त्यांच्या मुळ गावी आज त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सहा मे रोजी हा अपघात झाला होता.

****

बुलढाणा तालुक्यातल्या डोंगरखळा गावासाठी दररोज पाणी पुरवठा करण्याकरता एक टँकर मंजूर झाल्याची माहिती, उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिली. दिड हजारांहून अधिक लोकसंख्या असलेल्या या गावात तीव्र पाणी टंचाई निर्माण झाल्यानं हे टँकर उपलब्ध करुन देण्यात आलं आहेत.

****